महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३२

# महाराजा सयाजीराव आणि महात्मा गांधी

## दिनेश पाटील




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३२

# महाराजा सयाजीराव
# आणि
# महात्मा गांधी

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि महात्मा गांधी
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - ५२
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
प्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २३ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# महात्मा गांधी

‘भारताचा स्वातंत्र्यलढा आणि सयाजीराव’ हा विषय २०१६ पर्यंत पूर्णत: दुर्लक्षित होता. बाबा भांड यांनी २०१६ मध्ये ‘स्वातंत्र्यलढ्याचे पाठीराखे महाराजा सयाजीराव’ हा ग्रंथ लिहून हा विषय पहिल्यांदा चर्चेत आणला. भारतातील ५६५ संस्थानिकांमध्ये सयाजीराव हे एकटे सार्वभौम राजे होते. इंग्रजांशी मैत्रीचा करार असल्याने त्यांचा दर्जा स्वतंत्र राजाचा होता. स्वातंत्र्यासाठीच्या सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नाचे केंद्र बडोदा होते. या चळवळीचे सूत्रधार अरविंद घोष हे महाराजांचे खाजगी सचिव होते. बाळ गंगाधर टिळक यांना महाराजांनी पुण्यातील आपला गायकवाड वाडा इंग्रजांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी कागदोपत्री व्यवहार दाखवून भेट दिला होता.

दादाभाई नौरोजी हे तर बडोद्याचे दिवाण होते. लंडनमधील इंडिया हाऊस बांधण्यासाठी श्यामजी कृष्ण वर्मा यांना महाराजांनी आर्थिक साहाय्य केले होते. गोपाळ कृष्ण गोखले,

दादाभाई नौरोजी, मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीनचंद्र पाल, दिनशा वाच्छा, बॅ. विनायक सावरकर, बाबाराव सावरकर इ. लोकांना सयाजीरावांनी आर्थिक मदत केली होती.

भगतसिंग बडोद्यात आश्रयाला आल्याचे पुरावे सापडतात. तर जवाहरलाल नेहरू लंडनमध्ये शिकत असताना रात्री १ वाजता गुप्तपणे सयाजीरावांना भेटल्याचे संदर्भ नेहरू समग्र वाङ्मयात सापडतात. या पार्श्वभूमीवर महाराजा सयाजीराव आणि महात्मा गांधी यांचे नाते तपासले असता भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास 'सयाजीकेंद्री' भूमिकेतून नव्याने लिहिण्याची गरज अधोरेखित होते.

## सयाजीराव : गांधीजींचा आदर्श

गुजरातमध्ये आदरणीय व्यक्तींसाठी 'बापू' हे नामाभिधान प्रचलित आहे. संपूर्ण जग महात्मा गांधींना 'बापू' या नावाने बोलवत होते. परंतु स्वतः गांधीजी सयाजीरावांना आदराने 'बापू' म्हणत. यातच या दोघांमधील नात्याचे 'रहस्य' दडले आहे. गांधीजींना सयाजीराव वयाने मोठे असल्याने आदरार्थी होते असे नाही तर सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत दाखविलेली उत्तुंग झेप महात्मा गांधींनाही आदर्शवत वाटत होती. महात्मा फुले त्यांच्या वयाच्या साठीत २०-२२ वर्षाच्या सयाजीरावांचा फोटो आपला आदर्श म्हणून बैठकीच्या खोलीत लावत होते. असाच आदर महान चित्रकार राजा रवी वर्मा यांना महाराजांबद्दल वाटत होता.

त्याबाबत राजा रवी वर्मा बडोद्याचे तत्कालीन दिवाण टी. माधवराव यांना म्हणतात, “वयानं लहान आणि अजाण असले तरी सयाजीराव महाराजांपुढं नतमस्तक होताना निर्भेळ आनंद मला लाभला, तो इतर राजांपुढे लाभेल की नाही याची मला दाट शंका आहे.” बडोद्याहून राजा रवी वर्मा एक वेगळाच अनुभव घेऊन आले होते. ते सर्वांना सांगत होते की, “तो कुमार राजा, पण त्याचं तेज वय विसरायला लावतं. आयुष्यात एक अनमोल स्नेहबंध घेऊन आल्याचा आनंद मी उपभोगत आहे.” राजा रवी वर्मा यांचा हा अभिप्राय १८-२० वर्षाच्या तरुण सयाजीरावांबद्दलचा आहे. भारतात एखाद्या राज्याला त्याची विद्वत्ता आणि सुसंस्कृतपणा याबद्दल एवढा आदर अपवादानेच मिळाला असेल. जगभरातील विविध क्षेत्रातील विद्वान तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील नेते सयाजीरावांना जो आदर देत होते तो श्रीमंत राजा म्हणून नव्हता तर मानवी जीवनातील आदर्शांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून होता.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला पाठबळ

१८९५ मध्ये सयाजीरावांनी पुणे येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाला २,००० रु.ची मदत केली होती. १९०२ मध्ये अहमदाबाद येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनामध्ये आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय औद्योगिक प्रदर्शनाचे उद्‌घाटन सयाजीरावांच्या हस्ते झाले होते. अहमदाबादमधील राष्ट्रीय काँग्रेसच्या या वार्षिक अधिवेशनाचे

अध्यक्ष डॉ. रमेशचंद्र दत्त होते. ते पुढे १९०९ मध्ये बडोद्याचे दिवाण झाले. १९०६ मधील राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता येथील दुसऱ्या हिंदी औद्योगिक परिषदेचे उद्घाटनदेखील सयाजीरावांनी केले होते. याच परिषदेच्या महिला विभागाचे अध्यक्षपद महाराणी चिमणाबाई यांनी भूषवले होते व परिषदेतील भाषण इंग्रजीमध्ये केले होते. या सर्व घटनांमधून राष्ट्रीय काँग्रेसच्या कामात सुरुवातीपासून सयाजीरावांचा सहभाग टाळता न येण्याइतपत प्रभावी होता हे लक्षात येते.

'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' या भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे निर्णायक नेतृत्व करणाऱ्या संघटनेच्या स्थापनेपासून आर्थिक पाठबळाबरोबर सक्रिय सहभाग घेणारे सयाजीराव भारतातील एकमेव राजे होते. इंग्रज सरकारचा रोष पत्करण्याचे काम १८८१ ला राज्याधिकार प्राप्तीनंतर १८८३ पासूनच सयाजीराव करत होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतातील ब्राह्मणशाहीबरोबरच इंग्रजांकडून भारतातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाबद्दल फुल्यांनी त्यांच्या ज्या 'शेतकऱ्याचा आसूड'मध्ये इंग्रज सरकारवर जहरी टीका केली होती त्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी आर्थिक साहाय्य केले.

## गांधीजींना आफ्रिकेतील लढ्यासाठी मदत

१९०८ मध्ये गांधींनी दक्षिण आफ्रिकेतून पत्र लिहून केलेल्या विनंतीवरून सयाजीरावांनी आफ्रिकेतील भारतीय कामगारांच्या प्रश्नामध्ये लक्ष घालण्याची विनंती व्हाईसरॉयांच्या

मार्फत इंग्लंडमधील इंडिया हाऊसला निवेदनाच्या माध्यमातून केली. याबरोबरच गांधींच्या आफ्रिकेतील लढ्यासाठी त्यांनी आर्थिक मदतदेखील पाठवली. १९१५ मध्ये आफ्रिकेतून भारतात आलेल्या महात्मा गांधींनी पुढे काँग्रेसच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या या प्रयत्नांना विठ्ठल रामजी शिंदे यांच्या संस्थात्मक कार्याची पार्श्वभूमी लाभली होती. राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न हाती घ्यावा यासाठी विठ्ठल रामजी शिंदेंनी १९०७ पासून राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात ठराव मांडण्याचा प्रयत्न केला होता. १९०७ ते १९१७ या दहा वर्षांतील शिंदेंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नानंतर १९१७ च्या कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास करण्यात आला.

१९१५ मध्ये आफ्रिकेतून परतल्यानंतर गांधींनी तत्कालीन भारत समजून घेण्याच्या उद्देशाने रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून देशभर प्रवास केला. त्यांचा हा प्रवास म्हणजे राज्याधिकार प्राप्तीनंतर १८८२-१८८४ दरम्यान सयाजीरावांनी संस्थानातील जनतेची स्थिती समजून घेण्याच्या उद्देशाने केलेल्या बडोदा दौऱ्याचे ३१ वर्षानंतर योगायोगाने केलेले ‘अनुकरण’च होते.

## सयाजीराव : गांधीजींच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याची प्रेरणा

१९१७ मध्ये गांधींनी गोध्रा येथील पहिल्या गुजराथी राजकीय परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवले. या परिषदेत त्यांनी शारदाबेन मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पहिली गुजराथी सामाजिक परिषद घेण्याची सूचना केली. त्यानुसार राजकीय परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ही सामाजिक परिषद शारदाबेन मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शेवटच्या दिवशी गांधींनी गोध्रा शहरातील भंगी कॉलनीमध्ये अस्पृश्य परिषदेचे आयोजन केले. या परिषदेची ऐतिहासिकता अच्युत याग्निक आणि सुचित्रा शेठ यांनी त्यांच्या **'The Shaping of Modern Gujarat – Plurality, Hindutva and Beyond'** या ग्रंथात मांडली आहे. ते म्हणतात,**"... And for the first time in Gujrat wealthy merchants, lawyers, traders and other elite mingled with dheds and bhangis on one platform … It was a mighty gathering impossible for even the Gods to achieve and not seen by anyone in Hindusthan for centuries or rather thousands of years."**

सयाजीरावांनी राज्याधिकार प्राप्तीनंतर १८८२ पासून अस्पृश्य जातींना सरकारी खर्चाने शिक्षण उपलब्ध करून दिले. १९१३ पासून सयाजीरावांनी धारा सभेवर अस्पृश्य प्रतिनिधींच्या नियुक्तीस सुरुवात केली, तर १९१७ मध्येच त्यांनी अस्पृश्य

प्रतिनिधींबरोबर धारा सभेत बसण्याची तयारी असणाऱ्या सर्वसाधारण सदस्यांनाच धारा सभेची निवडणूक लढण्याची परवानगी देणारा नियम केला. हा नियम खास बाबासाहेबांना धारा सभेवर नेमण्यासाठी केला होता हे विशेष. गांधींनी आयोजित केलेल्या अस्पृश्य परिषदेच्या यशाला सयाजीरावांच्या या दीर्घकालीन प्रयत्नांची मौलिक पार्श्वभूमी लाभली होती.

गांधींच्या या अस्पृश्योद्धाराच्या कार्याबद्दल सयाजीरावांना आपुलकी होती. १९२३ मध्ये बडोद्यात केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, "आम्ही अस्पृश्य बांधवांना समता आणि बंधुत्व ही मानवी मूल्ये नाकारत आहोत. महात्मा गांधी आणि त्यांच्या विचारांची माणसे या सामाजिक प्रश्नांसाठी फार मोठे काम करत आहेत. जर आम्ही महात्मा गांधींचा सल्ला आणि मार्गदर्शन यांचे अनुकरण केले नाही, तर आपणास फार मोठ्या पश्चात्तापास सामोरे जावे लागेल." ज्या काळात गांधींचे नाव उच्चारणे हा गुन्हा ठरत असे त्या काळात सयाजीरावांनी जाहीर भाषणात गांधींचे अनुकरण करण्याचा सल्ला जनतेला दिला होता. ही बाब स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना म्हणून विचारात घ्यावी लागते. या भाषणामुळे ब्रिटिश सरकारच्या गोटात खळबळ उडाल्यानंतर गांधींच्या अस्पृश्य उद्धाराच्या कार्याची आपण स्तुती केल्याचा 'खुलासा' महाराजांनी केला.

## दांडी यात्रेला सहकार्य

महात्मा गांधी यांनी दांडी येथे उचललेल्या मिठामुळे ब्रिटिश साम्राज्याचा 'पाया' खचला. मार्च १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहासाठी काढण्यात आलेल्या दांडी यात्रेवेळी बडोदा संस्थानच्या हद्दीत गांधींना अटक करण्यासाठी ब्रिटिश सरकारकडून बडोदा संस्थानवर दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. बडोदा संस्थानच्या हद्दीत गांधींना अटक करण्याच्या बदल्यात 'रावबहाद्दूर' किताब मिळवून देण्याचे आमिष सुरतचे ब्रिटिश जिल्हाधिकारी ग्राहम यांनी बडोदा संस्थानातील नवसारी जिल्ह्याचे तत्कालीन सुभे नाडकर्णी यांना दाखवले. नाडकर्णी यांनी ही बाब महाराजांच्या कानावर घातली. तेव्हा 'आमचा तुम्हाला नैतिक पाठिंबा आहे; पण आपण बडोदा मुलुखात कृपया काही स्फोटक बोलू नका' असा निरोप सयाजीरावांनी गांधींना पाठवला. त्यावर गांधींनी महाराजांना 'काळजी न करण्यास' सांगितले. त्याचवेळी सयाजीरावांनी नाडकर्णींना गुप्त आदेश देऊन नवसारी जिल्ह्याच्या हद्दीत गांधींना अटक करून बडोद्याच्या प्रतिष्ठेला कलंक न लावण्याची ताकीद दिली. पेटलाद येथे गांधीजी आले असता बडोदा संस्थानच्या हद्दीतील पेटलादचे तहसीलदार सत्यव्रत मुखर्जींनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. त्याचप्रमाणे बडोदा संस्थानात इतर अनेक ठिकाणी नागरिक आणि बडोदा सरकारातील अधिकाऱ्यांनी गांधींचे स्वागत केले. महाराज आणि गांधी यांच्यातील 'योग्य

समन्वयामुळे’ गांधींची दांडी यात्रा बडोद्यातून निर्विघ्नपणे पुढे गेली. त्यानंतर महिनाभरातच गांधींना दांडी येथे ब्रिटिश सरकारने अटक केली.

## लक्ष्मीविलास पॅलेस भेट

महाराज सयाजीराव आणि महात्मा गांधी यांच्यातील नात्याचे अचूक विश्लेषण करणारा प्रसंग बाबा भांड यांनी त्यांच्या ‘लोकपाळ राजा सयाजीराव’ या पुस्तकात उद्‌धृत केला आहे. तो त्यांच्याच शब्दात समजून घेणे मननीय ठरेल. बाबा भांड लिहितात, “एके दिवशी महात्मा गांधींकडून महाराजांना निरोप आला - “बापू आम्ही तुम्हाला भेटायला लक्ष्मीविलास पॅलेसवर येतो.” महाराजांना आनंद झाला; पण त्याहून आश्चर्यही वाटले. ब्रिटिश सरकार दोघांकडेही संशयाने बघत असताना महात्मा गांधींची बडोदा गुप्तभेट ठरली. महाराजांनी कर्नल अनंतराव सडेकर पवार यांना बोलावले. ते महाराजांचे एके काळचे विश्वासू ए.डी.सी. होते.

“महात्मा गांधी भेटायला येत आहेत. भिंतीला कान असतात. तुम्ही साबरमतीपासून इथपर्यंत गांधींच्या गुप्तप्रवासाची आखणी करा.” महाराजांनी अनंतरावावर जबाबदारी सोपवली. विश्वासू माणसं साबरमतीला पाठवली. महात्मा गांधी बडोद्यात आले. लक्ष्मीविलास पॅलेसच्या प्रवेशद्वारी महाराजांनी गांधींचे स्वागत केले.

प्रवेशद्वारासमोरील जिन्यामधून महाराज गांधींना घेऊन ऐने

महालातील दालनात आले. महाराजांनी गांधींना समोरच्या आसनावर बसण्याची विनंती केली. महात्मा गांधी म्हणाले, "बापू, तुमच्यासमोर आम्ही खुर्चीवर बसणं शोभत नाही" आणि गांधी ऐने महालातील भारतीय बैठकीवर बसले. दोन्ही पाय उजव्या बाजूनं मुडपून बसायची त्यांची पद्धत होती.

महाराजांनी महात्मा गांधींचं स्वागत केलं. अनंतराव सडेकर पवारांना महाराज म्हणाले, “सेनापती, तुम्ही बैठकीच्या दारावर थांबा. गांधीजी इथं आहेत तोपर्यंत कोणालाही लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये प्रवेश देऊ नका.” अनंतराव सडेकर पवार ऐने महालातून बाहेर आले. दारातून मागे वळून बघितलं. नेहमी आपल्या खुर्चीत बसणारे महाराज महात्मा गांधींसमोर येऊन मांडी घालून बसले. अनंतरावांनी महाराजांस आपले सिंहासन सोडून असं जमिनीवर बसलेले महाराज कधीच पाहिले नव्हते. सेनापती सडेकर पवारांनी ऐने महालाचा मुख्य दरवाजा ओढून घेतला. आपला राजा महात्मा गांधींच्या समोर जमिनीवर बसला, हे दुसऱ्याने बघू नये असं सेनापतींना वाटू लागलं.”

## लंडनमधील गोलमेज परिषद

या दोन महापुरुषांची अशाच प्रकारची आणखी एक ऐतिहासिक भेट लंडनमध्ये झाली होती. १९३१ मध्ये लंडन येथील दुसऱ्या गोलमेज परिषदेदरम्यान अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र मतदारसंघावरून भारतीयांमध्येच प्रचंड गदारोळ माजला. यावेळी गदारोळ न करता पहिल्या परिषदेवेळचे

संवादी वातावरण पुन्हा निर्माण करून बंद झालेली चर्चा सुरू करण्याची विनंती १४ सप्टेंबर १९३१ रोजी सयाजीरावांनी सभागृहाला केली. परंतु त्यावेळी कोणीही त्यांचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. २१ सप्टेंबर १९३१ रोजी सयाजीरावांनी सभागृहाला संबोधित केले. त्यानंतर ४ दिवसांनी २५ सप्टेंबर रोजी लंडनच्या डॉर्चेस्टर हॉटेलमध्ये महात्मा गांधींनी महाराजांची भेट घेतली. या भेटीत गोलमेज परिषद व अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या ज्वलंत प्रश्नावर दोघांमध्ये चर्चा झाली असावी. सयाजीरावांच्या खंबीर आणि सक्रिय पाठिंब्याची खात्री असल्यामुळेच गोलमेज परिषदेसारख्या महत्त्वाच्या प्रसंगी गांधींनी त्यांची स्वतःहून भेट घेतली हे निश्चित.

## पुणे करार

स्वातंत्र्यपूर्वकालीन अस्पृश्यांच्या राजकीय अधिकारविषयक चर्चेत गांधी-आंबेडकर पुणे कराराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाबाबतच्या वादासंदर्भात २२ सप्टेंबर १९३२ रोजी टाटा सन्स अँड कंपनीच्या ए.डी. नौरोजी यांना लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, “तुमची तार मिळाली. मला वाटते की, तथाकथित उच्च हिंदू त्यांनी वागायला हवे, तसे वागत नाही. त्यांनी अस्पृश्यता पूर्णपणे दूर केली पाहिजे. हिंदुत्वामध्ये दुही टाळायची असेल तर सर्व जातीतील लोकांना समान संधी द्यायला हवी. डॉ. आंबेडकरांची समजूत घालू शकलो नाही,

याचा खेद वाटतो. श्री. गांधी यांनी उपोषणाचा आग्रह धरू नये, त्यांच्या त्यागामुळे काहीही साध्य होणार नाही.” सयाजीरावांच्या पत्रातून गांधी-आंबेडकर संघर्षात महाराजांची भूमिका किती सुस्पष्ट होती आणि जातीय विषमता अंताबाबत त्यांची भूमिका किती व्यापक होती हे स्पष्ट होते.

## हरिजन सेवक संघ

विशेष म्हणजे सयाजीरावांच्या या पत्रानंतर आठच दिवसांनंतर ३० सप्टेंबर १९३२ रोजी पुणे कराराच्या अंमलबजावणीचे पहिले पाऊल म्हणून मुंबई येथे ‘अखिल भारतीय अस्पृश्यताविरोधी लीग’ची स्थापना करण्यात आली. पुढे या लीगचे ‘हरिजन सेवक संघ’ असे नामकरण करून दिल्ली येथे या संस्थेचे मुख्य कार्यालय स्थापन करण्यात आले. या संस्थेच्या स्थापनेवेळी पुढील ३ मुख्य उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती.

१) अस्पृश्यता निवारणासाठी हिंदू समाजाच्या सर्व घटकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे आणि हिंदू जातींच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल घडवून आणणे.

२) अस्पृश्य जातींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी रचनात्मक कार्य करणे.

३) शक्य तितक्या लवकर सर्व सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा, रस्ते, शाळा, स्मशानभूमी आणि मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करणे.

सयाजीरावांनी १८७५ मध्ये बडोद्याच्या गादीवर आल्यापासून अस्पृश्योद्धारासाठी केलेले प्रयत्न लक्षात घेतल्यास हरिजन सेवक संघाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची त्याच्या स्थापनेआधीच बडोद्यामध्ये पूर्ती झाली होती असा निष्कर्ष निघतो. या संदर्भात सयाजीरावांच्या अस्पृश्यविषयक कार्याबद्दल महात्मा गांधींनी महाराजांचे केलेले अभिनंदन हा याचा उत्तम पुरावा आहे. ८ मार्च १९३३ रोजी येरवडा सेंट्रल जेलमधून सयाजीरावांना पाठवलेल्या पत्रात गांधी लिहितात, "महाराज आपण बडोदा संस्थानात हरिजनांसाठी शिक्षणाची दारं उघडली आणि अस्पृश्यतेचा कलंक कायद्याने पुसून या कामाची कायद्याने अंमलबजावणी केली. आपल्या या लोकोत्तर कामासाठीच आपण सर्वांहून अधिक अभिनंदनास पात्र आहात, हे कबूल करताना माझ्या मनात तिळमात्र शंका नाही."

गांधीजींचे वरील विधान भारतातील अस्पृश्य मुक्तीच्या इतिहासातील सयाजीरावांचे पथदर्शक स्थान स्पष्ट करते. गांधीजी वरील पत्रात जेव्हा म्हणतात, 'आपण सर्वांहून अधिक अभिनंदनास पात्र आहात' तेव्हा भारतातील गांधींसह अस्पृश्योद्धाराचे काम करणाऱ्या सर्वच समाजधुरिणांना सयाजीरावांच्या कामाने प्रेरणा दिली होती हेच अधोरेखित करतात. परंतु अस्पृश्य उद्धाराच्या अधिकृत इतिहासात विठ्ठल रामजी शिंदे वगळता एकाही इतिहासकाराने सयाजीरावांची दखल घेतलेली नाही.

## सयाजीराव बेदखल

महात्मा गांधी हे भारताच्या आधुनिक इतिहासातील सर्वात प्रभावशाली नेते मानले जातात. या पार्श्वभूमीवर आपण जेव्हा महाराजा सयाजीराव गायकवाड आणि महात्मा गांधी यांचा जोडून विचार करतो तेव्हा महात्मा फुल्यांप्रमाणेच महात्मा गांधीजींसाठीसुद्धा सयाजीराव गुरुस्थानी होते हे स्पष्ट होते. सयाजीरावांनी स्वातंत्र्य चळवळ असो, अस्पृश्यता निर्मूलन असो किंवा भारताचे आधुनिकीकरण असो, निर्णायक भूमिका बजावली असल्याचे अनेक पुरावे सापडतात. परंतु आधुनिक भारताच्या इतिहासात सयाजीरावांना अदृश्य ठेवण्याची किमया आपल्या इतिहासकारांनी जाणते-अजाणतेपणाने केल्याने आधुनिक भारताचा खरा नकाशा आजअखेर आपण तयार करू शकलो नाही.  आधुनिक भारताच्या खऱ्या नकाशात सयाजीरावांचे स्थान एखाद्या देशाच्या नकाशात जे स्थान राजधानीचे असते तसे आहे असा स्पष्ट निष्कर्ष निघतो.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवी असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com